सकाळ

# अभिषेक मिठारींकडून शरण अध्यासनास देणगी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी यांनी शरण साहित्य अध्यासनासाठी अकरा हजार रुपयांची देणगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केली. ॲड. मिठारी यांनी विद्यापीठाच्या अधिसभेमध्ये शरण साहित्य अध्यासन उभारण्याचा ठराव मांडण्यापासून ते उभे करण्यासाठीच्या प्रयत्नांतील प्रत्येक टप्प्यावर सहभाग राखला आहे. त्यानुसार त्यांनी अध्यासनासाठी आवश्यक कॉर्पस निधीसाठी वर्षभरात व्याख्याने, कार्यशाळा आणि कार्यक्रमांच्या माध्यमातून प्राप्त मानधनाचे अकरा हजार रुपये कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे धनादेशाच्या स्वरुपात सुपूर्द केले. पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या ९० व्या वाढदिवसाचे औचित्य साधून शरण साहित्य अध्यासनासाठी निधी सुपूर्द करीत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. यावेळी यश आंबोळे उपस्थित होते.

सकाळ

# विद्यापीठात विद्यार्थ्यांनी जाणून घेतली शिष्यवृत्तीची माहिती

कोल्हापूर, ता. २४ : शासनाच्या शिष्यवृत्ती योजना राबविल्या जात आहेत. त्यांची माहिती विद्यापीठ कार्यशाळेतून ४५० विद्यार्थी, शिक्षक आणि लेखनिकांनी घेतली. राजर्षी शाहू सभागृहातील कार्यशाळेचे उद्‌घाटन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते झाले.

शासनाने गुणवत्ताधारक, पात्र आणि गरजू विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या उच्चशिक्षणासाठी सवलत, शिष्यवृत्ती योजना जाहीर केल्या आहेत. त्यांची माहिती घेऊन त्यांचा लाभ घेणे आवश्यक आहे, असे कुलसचिव डॉ. शिंदे यांनी सांगितले. यावेळी समाजकल्याण सहाय्यक आयुक्त कार्यालयाचे सचिन परब, न्यू कॉलेजचे प्रयोगशाळा सहायक सुहास भोसले, अधीक्षक उमेश भोसले उपस्थित होते. डोंगरे यांनी कार्यशाळेचा उद्देश सांगितला. परब यांनी समाजकल्याणच्या योजनांची, शिष्यवृत्त्यांची माहिती दिली. भोसले यांनी महाडीबीटी संकेतस्थळावरील विविध शिष्यवृत्तींविषयी प्रात्यक्षिकांसह माहिती दिली. उपकुलसचिव तानाजी कुंडले यांनी स्वागत केले. सहायक कुलसचिव आर. आय. शेख यांनी आभार मानले.

पुढारी

# ‘रिसर्च अँड पब्लिकेशन ईथिक्स’ परीक्षा अर्ज भरण्यास २९ पर्यंत मुदत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२४ हिवाळी सत्रामध्ये होणाऱ्या ‘रिसर्च अँड पब्लिकेशन ईथिक्स’ परीक्षा अर्ज भरण्यास विद्यार्थी हितास्तव अतिविलंब शुल्कासह २९ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

विद्यापीठ परीक्षा विभागाने याबाबतचे परिपत्रक जारी केले आहे. त्यानुसार महाविद्यालय व पदव्युतर अधि विभागात दि. २९ अखेर अर्ज भरता येतील. महाविद्यालय व अधि विभागांनी दि. ३० तारखेपर्यंत परीक्षा अर्ज अॅप्रुव्ह करायचे आहेत. सर्व परीक्षा अर्जांच्या याद्या दि. ५ नोव्हेंबरपर्यंत जमा करावयात, असे आवाहन विद्यापीठाने केले आहे.

25 OCT 2024
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ संघ अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र

कोल्हापूर : प्रतिनिधी

झुंझुनू राजस्थान येथे सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेतील क्वालिफाईड मॅचमध्ये गतवर्षीच्या विजेत्या छत्रपती संभाजीनगर संघावर शिवाजी विद्यापीठ संघाने २९-३५ असा विजय संपादन केला. या विजयामुळे शिवाजी विद्यापीठाचा संघ अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.

सुरुवातीपासूनच चुरशीच्या झालेल्या या सामन्यांमध्ये छत्रपती संभाजीनगर संघाने पहिल्या पाच मिनिटात आक्रमक खेळीद्वारे शिवाजी विद्यापीठ संघावर नऊ गुणांची आघाडी घेतली. त्यानंतर



कोल्हापूर : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र शिवाजी विद्यापीठाचा कबड्डी संघ.

अभिषेक गुंगे याने केलेल्या उत्कृष्ट चढाया, विजय खडके याने दिलेली साथ, तर कर्णधार वैभव राबाडे व साईप्रसाद पाटील यांनी केलेल्या अप्रतिम पकड याच्या जोरावर विद्यापीठ संघाने चांगला खेळ केला.

मध्यंतरापर्यंत १४-१९ अशी पाच गुणांची आघाडी छत्रपती संभाजीनगर संघाकडे होती. मध्यंतरानंतर अभिषेक गुंगे यांनी एकाच चढाईत बोनस व तीन गुण असे चार गुण घेऊन सामन्याला कलाटणी दिली. त्यानंतर साईप्रसाद पाटील व कर्णधार वैभव दाभाडे यांनी केलेल्या अप्रतिम पकडीमुळे शिवाजी विद्यापीठ संघाने छत्रपती संभाजीनगर संघावर आघाडी घेतली. शेवटच्या पाच मिनिटांमध्ये शिवाजी विद्यापीठाकडे तीन गुणांची आघाडी होती. भक्कम अशा क्षेत्ररक्षणाच्या जोरावर विद्यापीठ संघाने हा सामना सहा गुणांनी जिंकला व बेस्ट ऑफ फोरमध्ये प्रवेश केला. अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा या दि. २४ ते २८ नोव्हेंबर अखेर झुंझुनू येथे होणार आहेत.